आपली सेवा आमचे कर्तव्य

राज्य सेवा हक्क आयोग
राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,
नविन प्रशासन भवन,७वा मजला,मंत्रालयासमोर —मुंबई -४०० ०३२
ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in
दुरध्वनी :- ०२२-२२८३२३४६

क्र. सेवानि-२०२५/प्र.क्र.३ /मुसेहआ /कक्ष-

दिनांक :- ३१ जानेवारी २०२५

प्रति,

संचालक,
माहिती तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषय :-** शासनाच्या वेबसाईट / आंतरजाळ (इंट्रानेट) प्रणालीवर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांच्या कार्यालयाकरीता गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी)/ गट-ब या संवर्गातून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करारपध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत अर्ज मागविण्याकरीता जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे. सदर जाहिरात शासनाच्या वेबसाईट / इंट्रानेट (आंतरजाळ) वर तातडीने प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

(वैशाली राज चव्हाण (निर्धार))
उप सचिव
राज्य मुख्य सेवा हक्क आयोग,मुंबई

**सोबत** :- सहपत्र

Application from retired Government Officers in cadre of Group A (Grade Pay less than Rs.7600) &Group B

**राज्य सेवा हक्क आयोग**
**राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय**
**७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.**

शासकीय/ निमशासकीय सेवेतून गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी)/ गट-ब संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरूप | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) किंवा गट- ब | "महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकरण/विभाग यांच्या सेवा देण्याच्या कामकाजाविषयी मुल्यमापन करणे व सांख्यिकी माहितीचे विश्लेषण व आयोगाचा वार्षिक अहवाल तयार करण्याच्या कामी सर्व आवश्यक ती कार्यवाही इ." | गट अ(ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) / गट-ब पदावरील. कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव<br>अर्हता:- पदवीधर.<br>संगणकाचे ज्ञान, तसेच लेखापरिक्षणाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा :- ५८ ते ६४ वर्षे |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण -२७१५ / प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ अन्वये नियुक्तीच्या अटी व शर्ती विनियमित करण्यात येतील.
२. करारपद्धतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही.
३. करार तत्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.
४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपद्धतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.
५. करारपद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह हि **जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. १५.०२.२०२५ पर्यंत सादर करावेत.**

**संपर्क** :- राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, ७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२

**दूरध्वनी :- ०२२ -२२८३२३४६**

**ई-मेल** :- ccrts@maharashtra.gov.in

मा.मुख्य आयुक्त यांच्या मान्यतेने

(वैशाली राज चव्हाण {निर्धार})
उप सचिव
राज्य मुख्य सेवा हक्क आयोग

स

C:\User

C:\Users\kavita.chavan\Desktop\प्रिती परब -२०२५\गवस मॅडम\२०२४\२०२४ करार पद्धतीने नियुक्ती (Autosaved).docx